तरुण भारत
www.tarunbharat.net
गुरुवार, १६ फेब्रुवारी २०१७ १५

# तिरपुडे महाविद्यालयात तायक्वाँडो स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**नागपूर, १५ फेब्रुवारी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाद्वारा नाशिकराव तिरपुडे शारीरिक शिक्षण महाविद्यालय व तिरपुडे समाजकार्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या क्रीडा संकुलामध्ये आंतरमहाविद्यालयीन तायक्वाँडो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धेत पुरुष आणि महिला सांघिक गटामध्ये तुमसरातील एस. एन. मोरे कॉलेजने विजय मिळविला. याप्रसंगी प्राचार्य विवेक अवसरे, प्रा. संतोष चौधरी, नारायण वाघाडे, प्रा. डॉ. तपन भद्रा व डॉ. सादिक आदी मान्यवरांच्या हस्ते एस. एन. मोरे महाविद्यालयाच्या विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अविनाश शहारे यांनी केले. आभार प्रा. डॉ. दिगांबर तुले यांनी मानले. स्पर्धेच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. सुनीता सोनारे, प्रा. डॉ अनिता मुदलियार, प्रा. डॉ. हंबीर मोहिते, प्रा. डॉ. सुनील घुलक्षे, प्रा. डॉ. ज्ञानेश्वर चिमोटे, प्रा. नरेश धुर्वे, प्रा. सचिन हुंगे, प्रा. शिल्पा जिभेनकर आदींसह कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. ■



स्पर्धकांना मार्गदर्शन करताना मान्यवर